# विज्ञानाची मजा

(विज्ञान शाहीर प्रभाकर आमरखेडकर, मुंबई)

काय किती मजा सांगू विज्ञानाची, प्रगतिच्या आकाशात उडण्याची ॥धृ॥

बैलाविण ओढे गाडी । मोटे विण काढे पाणी । अक्कल गुंग झाली कशा सम्राटांची ॥१॥
तेलाविण जळे दिवा । वात नाही पणतीला । करामत बटन दाबण्याची ॥२॥
जात्यावर नको ओवी । पीठ दळे चाडिमंधी । विज्ञानाची गिरणी लाभाची ॥३॥
काबाड कष्ट केले कमी । विज्ञानाची हीच हमी । मानवाची सेवा करण्याची ॥४॥
संकराचा चमत्कार । दूध देई मणभर । नवी गोमाता भाग्याची ॥५॥
आली आली नवी कोंबडी । सोन्याची देई अंडी । नफ्याची गॅरंटी समद्यांशी ॥६॥
किती पुढे गेला काळ । नलिकेत होती बाळ । वेळ आली विचार करण्याची ॥७॥
पाट्याविना वाटे चटणी । गॅस वर देई फोडणी । तडफ थंडगार पाण्याची ॥८॥
नवी नवी आली खेळणी । मुलबाळ त्यात रमली । करमणूक केली समद्यांची ॥९॥
बसा बसा विमानात । ऊंच उडा आकाशात । अंतर कमी झाले देशांची ॥१०॥
आकडेमोड नको आता । कॅल्क्युलेटर आला हाता । गरज नाही पाढे पाठ करण्याची ॥११॥
इथून बोला दूरवर । चित्र बघा रंगदार । कमाल बिनतारी यंत्रांची ॥१२॥
विज्ञानान दिली भेट । उपग्रह आकाशात । तिन्ही लोक जिंकून घेण्याची ॥१३॥
कॉम्प्यूटरच आलं युग । यंत्रमानव पाठोपाठ । वाट बिनधोक आता प्रगतीची ॥१४॥
विज्ञानाचा लावा घोडा । विकासाचा रथ ओढा । नामी संधी दैन्य दूर करण्याची ॥१५॥
नको नको अणुबॉम्ब । विनाशाचा उठे डोंब । शिरजोरी विनाशाच्या शास्त्राची ॥१६॥
21 व्या शतकात । प्रवेश करू स्वागतात । धरा धरा कास आता विज्ञानाची ॥१७॥
विज्ञान शाहीर प्रभाकर । विज्ञानाच सांगे सार । विज्ञानाची संगत लाभाची ॥१८॥

—०—

मुंबई
२४-२-८६

(एचएमव्ही रेकॉर्ड वर येत)

आमरखेडकर
(प्रभाकर आमरखेडकर)